सामना दि. ०४/०९/२०२२



गावठी पिस्तूल घेऊन फिरणारास अटक करण्यात आलेला आरोपी.

# गावठी पिस्तूल जप्त करून एकास अटक

नांदेड, दि. ३ (प्रतिनिधी) - गोवर्धनघाट परिसरात काल रात्री वजिराबाद पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्यास अटक केली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गोवर्धनघाट परिसरात एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलीस उपअधीक्षक चंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्यासह पोलिसांचे पथक त्या परिसरात पोहचले आणि हरिश प्रकाश भगत (रा. दिलीपसिंघ कॉलनी) यास ताब्यात घेतले. त्याच्याजवळ एक देशी गावठी पिस्तूल आढळून आले आहे. ज्याची किंमत २५ हजार रुपये आहे. पोलिसांनी हरिश भगत यास अटक करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.